**नि.फौ.ख.क्रं. ४७/२०१८** **निशाणी क्र. १२**
**शासन .वि. परशराम पराते**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०५ ची शपथेवर जबानी**

.......

**माझे नांव** – प्रफुल जगदीश नरानीया
**वय** – ४७ वर्षे, धंदा – व्यापार,
**राहणार** – सेलू, ता. सेलू व जि. वर्धा.

.......

**सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत**

**१.** मी आरोपीला ओळखतो. फिर्यादी हे माझे मित्र आहे. त्यांचा मला फोन आला होता की, हमदापूर परिसरात बिबटयाचा वावर आहे त्यासाठी तेथे जायचा आहे. आम्ही दोघे तेथे गेलो. तेथील लोकांशी बोलचाल झाली. बिबटया आम्हाला आढळुन आला नाही. माझे मित्र फिर्यादी यांना पाठीचा त्रास होता. तेव्हा तेथील लोकांनी फिर्यादीला आरोपीबाबत सांगितले की, ते एक चांगले डॉक्टर आहे त्यांना तुम्ही दाखवुन द्या. त्यानुसार आम्ही आरोपीच्या घरी हमदापूरला गेलो. तेथे आरोपीने फिर्यादीच्या एका हातामध्ये फुल दिले व दुस–या हातामध्ये एक वजन ठेवले. त्यानंतर फिर्यादीचे हात दुखायला लागले. आरोपी फिर्यादीला म्हणाला की, जेवढे वजन तुमच्या हातावर आहे तेवढी करनी तुमच्या वर करण्यात आलेली आहे. वजन साधारणतः ०७ ते ०८ किलो होता. आरोपीने फिर्यादीकडे २००/– रुपये ची मागणी केली आणि त्यांना लिंबू, करदोडा, काळा बुक्का व अंगारा दिले आणि त्यांना पुन्हा एक महिन्यानंतर येण्यास सांगितले. येतांना त्यांना तावीज व इतर साहित्यासाठी १००/– ते १५०/– रुपये लागतील असे सांगितले. त्यानंतर आम्ही तेथुन निघुन गेलो. सदरची बाब ही आम्हाला उपचार नसुन अंधश्रद्धा आहे असे वाटल्याने फिर्यादी हे अंधश्रद्धा निरमुलन समितीच्या पदाधिका–यांना भेटले व नंतर त्यांनी पोलीस स्टेशनला आरोपीविरुद्ध तक्रार दिली. त्यानंतर पोलीस आरोपीला अटक करण्यासाठी गेले. तेव्हा मी, फिर्यादी व अंधश्रद्धा निरमुलन समितीचे अधिकारी सोबत गेले होतो. तेथे पाच ते सहा लोकं बसलेले होते

व आरोपी लोकांवर उपचार करत होते व उपचाराकरिता लिंबू, तावीज, काळा बुक्का, दगड इत्यादि साहित्य होते. घटना ही अंदाजे डिसेंबर, २०१६ ची आहे. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास संपला</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ आर.व्ही.मुन यांच्या मार्फत :</u>**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीसोबत आरोपीच्या घरी कधी ही गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील माहिती फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी आज रोजी सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील सांगितल्याप्रमाणे साहित्य प्रत्येकाच्या घरामध्ये असतो. हे म्हणणे खरे आहे की, अनेक लोकं घरामध्ये दरवाजाला लिंबू व मिर्चा लावत असतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील माहिती ही एकीव माहितीच्या आधारे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी फिर्यादी व अंधश्रद्धा निरमुलन समितीच्या पदाधिका–यांचा सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला</u>**.

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2025.11.20 17:02:09 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**<u>दिनांक</u>** : २०/११/२०२५